हैद्राबाद मुक्तीसंग्राम व मराठवाडा संदर्भात डॉ.भागवत श्रीरंगराव ढेंगळे यांचे लेखन कार्य : एक अभ्यास

प्रा.डॉ.शिंदे अनंत नामदेवराव
इतिहास विभाग,
बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय उदगीर,
ता.उदगीर जि.लातूर.

मराठवाडयातील इतिहासाविषयी झालेले इतिहासलेखन अभ्यासताना प्रामुख्याने हैद्राबाद मुक्ती संग्राम बद्दल झालेले लिखाण अभ्यासायचे असेल तर प्रमुख इतिहास लेखन कार्यात डॉ.भागवत श्रीरंगराव ढेंगळे यांचे नाव पुढे येते.

डॉ.भागवत श्रीरंगराव ढेंगळे यांचा जन्म स्वातंत्र्यपुर्व ७ नोव्हेंबर १९४३ मध्ये पारा ता.कळंब जि.उस्मानाबाद (मराठवाडयात) या लहानशा गावी झाला. तशी कुटूंबाची परिस्थिती अतिशय हालाखीची होती. अतिशय प्रतिकुल परिस्थितीतुन आपले शिक्षण पुर्ण करुन सर्व प्रथम जुलै १९६९ मध्ये अधिव्याख्याता म्हणुन पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालय येथे अध्यापनाचे कार्य सुरु केले. पुढे नांदेडच्या यशवंत महाविद्यालयात इतिहासाचे अधिव्याख्याता म्हणुन त्यांची निवड झाली. यशवंत महाविद्यालयात यशस्वीरित्या ३२ वर्ष सेवा पूर्ण केली. याकाळात त्यांनी आपले अध्यापन कार्याबरोबरच विविध समित्यावर विविध पदे भूषविले. पीएच.डी. , एम.फील पदवीसाठी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणुनही आजतागायत कार्य करत आहेत. चर्चासत्र, कार्यशाळाच्या माध्यमातुन विविध विषयावर लेखन कार्य केले आहे.[१]

त्यांनी आपल्या पी.एच.डी. पदवी साठी कै.डॉ.रमेश गुप्ते , डॉ.प्रभाकर देव यांच्या मार्गदर्शनाखाली हैद्राबाद मुक्तीसंग्रामात मराठवाडयाचे योगदान (कॉंट्रीब्युशन ऑफ मराठवाडा इन हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल) ह्या विषयाची निवड केली.

त्यांनी केलेल्या संशोधनात्मक इतिहासलेखाची प्रचिती त्याच्या हैद्राबाद मुक्ती संग्रामातील मराठवाडयाचे योगदान या ग्रंथातुन स्पष्ट होते.

हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मुक्ती संग्राम काळातील कार्याचे व आठवणीचे विधेयक आणि विश्लेषणात्मक वर्णन केले आहे. त्याशिवाय मेजर कोर फील्ड सारख्या काही इंग्रज अधिकाऱ्यांचे तत्कालीन लिखाण यांच्या अभ्यास संशोधनात्मक पध्दतीने करुन त्याची सत्यता पुढे आणली आहे. त्याच बरोबर मराठवाडयातील स्वातंत्र्य सैनिकांच्या व्यक्तीगत संग्रहातील कागदपत्रे, मुलाखती, हैद्राबाद, दिल्ली येथील राष्ट्रीय अभिलेखे निरनिराळया ठिकाणी संग्रहित असलेली कागदपत्रे व तत्कालीन कात्रणाच्या आधरे लिखाण केले आहे.[२] त्यावरुन हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा सर्व अंगाचा अभ्यास त्यांनी केलेला आहे हे स्पष्ट होते.

१८८४ पासुन महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा निजामाच्या हैद्राबाद सरंचनातील मराठी भाषिक प्रदेश मराठवाडा या नावाने ओळखला जाऊ लागला. हैद्राबाद संस्थानाचे राज्य मध्ययुगीन राजसत्तेचे असल्याने सर्व सत्ता निजाम उस्मानअलीच्या हाती केंद्रीत झालेली होती. त्यांनी प्रथमच अनेक माध्यमातून मराठवाडयाची ऐतिहासिक पार्श्वभुमी सामाजिक, राजकीय जागृती, संघटनात्मक संघर्ष, सुधारणा ते छोडो भारत, रझाकार चळवळ, मोठी झेप, शेवटच्या संघर्षाला सुरुवात, वाटाघाटी आणि भारतीय संघात सामील करण्याच्या दिशेने पाऊल अशी विभागणी करुन प्रथम दर्जाचा साधनांचा वापर करुन लेखन कार्य पुर्ण केले आहे.[३]

यामध्ये त्यांनी मराठवाडयाच्या ऐतिहासिक पार्श्वभुमीचा अभ्यास करुन मराठवाडयातील सीमा, भाषा, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती यावर प्रकाश टाकला आहे. एकंदरीत निजाम सरकारचे नेतृत्व, प्रजेवर शासकीय

अधिकाऱ्याद्वारा होणारे अत्याचार स्पष्टपणे मांडले आहेत. निजाम रझाकार यांच्या छाळाला कंटाळून विरोध करण्याची व्यासपीठे कशी उभारली गेली हे त्यांनी दाखवुन दिले आहे. मराठवाडा विभागाला संघटनात्मक करण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनात अनेकाला स्थान दिले आहे. त्यात प्रामुख्याने वामनराव नाईक, केशवराव कोरटकरांची नेतृत्वाची पहिली पिढी आहे हे स्पष्ट केले आहे.

याच बरोबर डी.जी.बिंदू , गोविंदराव नानल व के.एस.वैद्य यांनी देखील सहभाग नोंदविला आहे. प्रामुख्याने स्वामी रामानंद तीर्थाचा उल्लेख हैद्राबाद मुक्ती चळवळीचे पितामह म्हणुन केला आहे. राज्यस्तरापर्यंत पोहचलेल्या नेतृत्वाचे जी.एम.वैशम्यायन, एस.के.परांजपे, बाबासाहेब यांची दखल घेतली आहे. या लेखनात मराठवाडयातील रझाकार नेता कासिम रझ्झवी व स्वामीजी हे दोघेही उस्मानाबाद जिल्ह्यातील आहेत असे निदर्शनास आणुन दिले आहे.[४]

सत्याग्रह चळवळ संघटना विभागात अधिक प्रभावशाली मराठवाडयातील नांदेड येथे झाली होती. त्यात व्यक्तीगत, सामुहिक, जंगल, झेंडा, सत्याग्रह इत्यादी अनेक माध्यमातुन निजाम सरकार विरुध्द लढा देण्यासाठी संघटित झाले होते. ही माहिती उजेडात आणली. सरकारला विरोध दर्शविण्यासाठी लोकांनी अनेक ठिकाणी जाळपोळ, पेलिस ठाण्यावर दगडफेक, गाडया अडविणे, रास्ता रोको करणे, १५ लाख शिंधीची झाडे तोडून लोकांनी सरकारचे धोरण व सत्तेला विरोध दर्शविला. या संघर्षात लहान मोठया प्रत्येक गावातील पुरुष, महिला, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांही मोठया प्रमाणात सहभागी झाल्याचा उल्लेख आढळतो.

संघर्षात हळूहळू शस्त्राचा वापर करण्यात येवु लागला होता म्हणुन संशस्त्र संघर्ष ही एक हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महत्वाची चळवळ होती. ही चळवळ संघर्ष कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली चालविली जात होती. या संघर्षाला १४ महिन्याच्या कालावधी होता. या संघर्षाच्या शेवटच्या टप्यात मोठया प्रमाणात अनेक घडामोडी झाल्या. सशस्त्र संघर्षासाठी राज्यसीमेवर राज्यात प्रमुख ठिकाणी अनेक प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली गेली. मराठवाडयात ११५ प्रशिक्षण केंद्रे होती. [५]

यामुळे कॅम्पसमध्ये जास्तीत - जास्त लोक मराठवाडयातील होते. या कॅम्पस व्यतिरिक्त राज्याबाहेर वाशिम, मनमाड, देऊळगाव व सोलापूर अशा ठिकाणी कॅम्प होते. या कॅम्पसमध्ये देखील त्या भागातील काही स्वातंत्र्यप्रेमी सोबत मराठवाडयातील लोकांचाच समावेश होता. राज्याचा इतर भागांच्या तुलनेत मराठवाडयात सशस्त्र संघर्षाच्या कारवाया व सीमाबलाच्या कारवाया सर्वाधिक परिणामकारक ठरल्या. मराठवाडयातील २७४ खेडी स्वतंत्र म्हणुन घोषित करण्यात आली. या संघर्षाच्या माध्यमातून ६१५ करावाया करण्यात आल्याची आकडेवारी साधना आधारे त्यांनी स्पष्ट केली. निजाम राजवटीतील अनेक पदावरील अधिकारी आपल्या पदाचा राजीनामा देवुन या लढयात सहभागी झाले. विभागातील १७५ पोलिस ठाण्यावर हल्ले करण्यात आले. मराठवाडयातील रेल्वे मार्ग ठिकठिकाणी तोडण्यात आले. बँकेवर दरोडा घातला त्याचे उदाहरण म्हणजे उमरी बँक प्रकरण या संघर्षातील सर्व कारवाया यशस्वी झाल्याचे स्पष्ट होते.[६] या संघर्षात मराठवाडयाचे योगदान उल्लेखनीय आहे. यामध्ये स्त्रियाचा मोठया प्रमाणात सक्रीय सहभाग नोंदवला गेला होता.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात मराठवाडयातील स्त्रियांचा सहभाग मोठा होताच त्याचप्रमाणे राजकारणातही तो तितकाच होता. रझाकाराच्या कारवायांना प्रत्युत्तर देणाऱ्या स्त्रियामध्ये रझाकाराच्या कारवायांना प्रत्युत्तर यशस्वी पध्दतीनेच होते. दगडाबाई शेळके, लक्ष्मीबाई मुनगीकर यांची नावे महत्वाची आहेत. यात आशाताई वाघमारेच्या नेतृत्वाखाली स्वयंसेविकांचा मोठा दल काम करत असे. कृति समितीचे अध्यक्ष डी.जी.बिंदू याच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रकारे उल्लेखनीय उद्रेक इथेच झाला.[७] उमरी बँकेवरील कारवाई दिर्घकाळासाठी प्रभावी ठरली. यामुळे हैद्राबाद राज्याच्या प्रशासनाला मोठा आधार झ्झाला. या कार्यवाहीवरुन लोकांचे नैतिक धैर्य आणि निष्ठा स्पष्ट दिसून येते. पारनुरचे जंगल सत्याग्रह लोकप्रिय उद्रेकाची घटना होती. पोलिसांना पुर्वसूचना देवुन आदेश धुडकावून हजारो लोकांची जंगलावर चाल करुन शिंदीची झाडे कापुन टाकली. या घटनेने राष्ट्रीय नेतृत्वाचे लक्ष वेधले गेले. म्हणुन मराठवाडयातील चळवळ हिंसक तसेच अहिंसक या देन्ही पातळीवर महत्वाची ठरली. हजारोंच्या संख्येने लोक शांतता व हिंसक या दोन मार्गाचा अवलंब करण्यास तत्पर होते. यावरुन नागरी स्वातंत्र्य जबाबदार शासन आणि भारतीय

संघात हैद्राबाद विलीन करण्यासाठी मराठवाडयाचा सहभाग कसा उल्लेखनीय होता हे त्यांनी अतिशय योग्यरित्या स्पष्ट केले आहे.

निष्कर्ष :

डॉ.भागवत श्रीरंगराव ढेगंळे यांनी अतिशय अथक परिश्रमाने इतिहास लेखनाचे कार्य केले आहे. हे त्यांच्या लिखाणास वापरलेल्या साधनावरुन लक्षात येते. साधनांची जमवा जमव हैद्राबाद सारख्या शहराच्या मोठया संग्रहातून माहिती उपलब्ध केल्याचे दिसुन येते. स्वातंत्र्याच्या संदर्भात प्रत्यक्ष सहभाग घेतलेल्या अनेक नामवंत लोकांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

त्यांनी उस्मानाबाद, नांदेड,बीड, पैठण इत्यादी अनेक शहराचा लढयातील सहभागी असणाऱ्या त्याच बरोबर लिखाणात युवक, स्त्रियांचा लढयातील सहभाग यावरही चिकित्सकपणे लिखाणात उल्लेख केला आहे.

ऐतिहासिक दस्ताऐवजाचा वापर मुक्ती संग्रामातील सर्व घटनांची सुसंगतपणे नोंद व प्राथमिक स्त्रोताच्या जास्तीत जास्त उपयोग त्यांनी केला आहे.

संदर्भ :

1. डॉ. बी.एस.ढेंगळे यांची प्रत्यक्ष नांदेड येथे घेतलेली मुलाखत दि. ८.६.२००८
2. कित्ता
3. Dr.Dhengle B.S. - Hyderabad Fredom Struggle Kalpana Prakashan,Nanded - 1998 P.No. 13-287
4. Ibid P.No. 13 - 250
5. Ibid P.No. 15 - 75
6. Ibid P.No. 22 - 98
7. Ibid P.No. 13 - 287